**आकाशवाणी पुणे**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**पुणे वृत्तांत**

**वेळ - संध्याकाळी 06.00 वा.**

**दिनांक- 01.08.2025** **वार- शुक्रवार**

---

## टिळकपुरस्कार

देशात विश्व गुरू बनण्याची क्षमता असून तरुण आणि गुणवान तंत्रज्ञ तयार होत आहेत; त्यांनी आत्मविश्वास, आणि सकारात्मकता कायम राखली तर लोकमान्य टिळकांनी पाहिलेलं स्वराज्याचं स्वप्न सत्यात उतरेल असा विश्वास केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी आज पुण्यात व्यक्त केला. त्रेचाळीसावा लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कार आज गडकरी यांना प्रदान करण्यात आला; त्यावेळी ते बोलत होते. टिळक स्मारक ट्रस्टचे अध्यक्ष रोहित टिळक यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. सन्मानपत्र, स्मृतिचिन्ह आणि एक लाख रपये असं या पुरस्काराचं स्वरुप आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, आणि एकनाथ शिंदे, माजी केंद्रीय मंत्री सुशील कुमार शिंदे, उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

लोकमान्य टिळकांसारखा बाणा असणारे नितीन गडकरी हे केवळ नेते नाहीत तर संशोधक आहेत, अशा शब्दात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस गडकरी यांचा गौरव केला. गडकरी यांनी पक्षीय राजकारणाऐवजी विकासाचं राजकारण करून देशात रस्ते, महामार्ग, पूल यांचं जाळ भक्कम केलं, असं उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले. तर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या स्वप्नातील विकसित भारताच्या शिल्पकरांपैकी नितीन गडकरी एक महत्त्वाचे नेते आहेत, असं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यावेळी म्हणाले.

**टिळकपुण्यतिथी-अण्णाभाऊसाठेजयंती**

भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील अग्रणी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त आज पुण्यात सर्वत्र त्यांना आदरांजली अर्पण करण्यात आली.

लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या 105व्या जयंती निमित्त त्यांनाही पुण्यातील विविध संस्था संघटनांच्या वतीनं अभिवादन करण्यात आलं. या निमित्तानं सामाजिक आणि सांस्कृतिक उपक्रमांचं आयोजनही करण्यात आलं होतं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पुण्यात अण्णा भाऊंच्या साहित्यखंडांचं प्रकाशन करण्यात आलं. तर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सारसबागेजवळच्या अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं. साहित्य, लोककला, सामाजिक परिवर्तन आणि

संयुक्त महाराष्ट्र चळवळ अशा विविध क्षेत्रांत अण्णाभाऊंनी केलेल्या अतुलनीय कार्यापुढे आपण नतमस्तक आहोत, असं पवार यावेळी म्हणाले.

## महसूल सप्ताह

केंद्र आणि राज्य सरकारतर्फे पुणे जिल्ह्यात विविध विकासकामं केली जात आहेत; महसूल विभागाने लोकाभिमुख, पारदर्शक आणि गतीमान पद्धतीने विकासकामं वेळेत मार्गी लावावीत, असं आवाहन उपमुख्यमंत्री आणि पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी केलं. पुणे विभागीय आयुक्तालयात महसूल सप्ताहाचा प्रारंभ आज झाला; त्यावेळी ते बोलत होते. महसूल सप्ताह केवळ महसूल विभागापुरता मर्यादित न ठेवता सर्व विभागांना सहभागी करून यशस्वी करावा, शासकीय कामकाजात तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्यावर भर द्यावा, अशी सूचना पवार यांनी केली. उत्कृष्ट काम करणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना यावेळी गौरवण्यात आलं.

## दूध खरेदी वाढ

पुणे जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघाने म्हणजेचं कात्रज दूध संघाने आजपासून गायीच्या दुधाच्या खरेदी दरात प्रतिलिटर एक रुपयानं वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे आता गायीचं दूध प्रति लिटर 32 रुपयांच्या ऐवजी 33 रुपये दराने खरेदी केलं जाईल अशी माहिती कात्रज दूध

संघाचे व्यवस्थापकीय संचालक मनोज लिमये यांनी दिली. दुधाच्या खरेदी दरात वाढ करण्यात आलेली असली तरी ग्राहकांसाठीच्या विक्री दरात कोणतीही वाढ करण्यात आलेली नाही असं लिमये यांनी सांगितलं.

**आंदोलन**

लोणावळा आणि खंडाळ्याला भेट देणाऱ्या पर्यटकांकडून पोलिस दंड वसूल करत असल्याच्या विरोधात आज नागरिकांनी खंडाळा घाटात आंदोलन केलं. खंडाळा घाटात महामार्गावर बंदोबस्तासाठी असलेले पोलिस पर्यटकांकडून प्रवेशाच्या नावाखाली दंड वसूल करत असल्याचा आरोप महाराष्ट्र काँग्रेस समितीचे सचिव निखिल कवीश्वर यांनी केला आहे.

**विश्वबंधुता**

बारावं विश्वबंधुता साहित्य संमेलन येत्या शुक्रवारी पिंपरी इथल्या महात्मा फुले महाविद्यालयामध्ये होणार आहे. या संमेलनाच्या निमित्ताने दिला जाणारा 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रज्ञावंत पुरस्कार' मुस्लिम सत्यशोधक मंडळाचे अध्यक्ष, ज्येष्ठ साहित्यिक डॉ. शमशुद्दीन तांबोळी आणि ज्येष्ठ आयुर्वेदतज्ज्ञ डॉ. जयकुमार ताम्हाणे यांना जाहीर झाला आहे.

**हवामान**

पुणेकरांनी आज दिवसभर ऊन पावसाचा खेळ अनुभवला. उद्याही ढगाळ हवामानासह हलक्या पावसाची शक्यता असल्याचं पुणे वेधशाळेनं म्हटलं आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**